## • ११ जुलै हा दिवस "जागतिक लोकसंख्या वाढ इशारा दिन" • म्हणून पाळणेबाबत

११ जुलै १९८७ रोजी जगाची लोकसंख्या ५०० कोटी झाली तेव्हापासून ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या वाढ इशारा दिन म्हणून पाळण्यात येतो. लोकसंख्या वाढ ही आपल्या देशापूढील प्रथम क्रमांकाची समस्या आहे. त्यामुळे समाजाच्या सर्व घटकांमध्ये विशेषत: शालेय विद्यार्थ्यांमध्ये लोकसंख्या वाढीच्या दुष्परिणामांविषयी जाणीव जागृति करणे या उदेद्शाने हा दिन पाळण्यात येतो त्यादृष्टीने गतवर्षीप्रमाणे यावर्षीही आपल्या विद्यालयात विद्यार्थी तसेच समाजामध्ये हा इशारा दिन पाळण्याच्या दृष्टीने लोकसंख्या शिक्षण विषयक कार्यक्रमाचे आयोजन करावे त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे असावे.

१. शाळेत लोकसंख्या शिक्षण विषयक तक्ते, चित्र, आलेख लावावेत. भिंतीवर फलकावर लोकसंख्या शिक्षण विषयक घोषवाक्ये लिहावीत अशा रितीने वातावरण निर्मिती करावी.
२. लोकसंख्या शिक्षण विषयक निबंध, वक्तृत्व, घोषवाक्य, काव्य स्पर्धा इ.स्पर्धांचे आयोजन करावे.
३. लोकसंख्या शिक्षण विषयक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून लोकगीते, भारूड,पथनाटय इत्यादी मधून लोकसंख्या वाढ दिनाची जागृती निर्माण करावी.
४. प्रभातफेरीचे आयोजन करून त्यावेळी लोकसंख्या शिक्षण विषयक संदेश देणा-या घोषणा देण्यात याव्यात तसेच शालेय परिसराची स्वच्छता करून घ्यावी.
५. लोकसंख्या शिक्षण या विषयावर तज्ञ व्यक्तिची व्याख्याने आयोजित करून आरोग्य विषयक कार्यक्रमाचे आयोजन करावे.
६. पालक मेळावा आयोजित करून त्यामध्ये अंधश्रध्दा निर्मुलन प्रयोग, व्यसनमुक्ती यावर तज्ञाची व्याख्याने आयोजित करावी.